"महिला शिक्षिकांच्या कौटुंबिक आणि नोकरीविषयक भूमिका संघर्षाचा समाजशास्त्रीय अभ्यास": विशेष संदर्भ : बीड जिल्हा

प्रस्तावना :-

भारतीय महिला दिवसेंदिवस वेगवेगळया क्षेत्रांत प्रगती करीत आहेत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात आपली एक नवी ओळख निर्माण करीत आहे. स्त्रियांनी आर्थिक क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. एक काळ असा होता की, स्त्रिया घराबाहेर पाऊल ठेवू शकत नव्हत्या. परंतु आज स्त्रिया अनेक कारणांसाठी अर्थार्जन करु लागल्या आहेत. कधी संसाराला हातभार लागावा म्हणून तर कधी जीवनमान उंचावण्यासाठी तर कधी स्त्रियांना घरी बसणे योग्य वाटत नाही. नोकरी करुन मुलींनी हुंड्यासाठी पैसे गोळा करावेत असे आईवडिलांचे मत असते कधी आर्थिक स्वावलंबनासाठी अर्थार्जन करणे आवश्यक असते.या विविध कारणांसाठी स्त्रिया नोकरी करतात, तर क्वचितप्रसंगी व्यवसायही करतांना दिसून येतात.

मानवी जीवनाचा मागोवा घेतला असता असे दिसून येते की, सर्वकाळ स्त्रियांना सारखा दर्जा असणे संभवत नाही.विभिन्न कालखंडात स्त्री दर्जात चढ उतार झालेला दिसतो.कालानुरुप भारतीय समाजाच्या मुल्यात्मक व्यवस्थेत बदल होत गेला आहे. हे वेळोवेळी झालेले बदल आणि त्या अनुषंगाने स्त्रियांच्या दर्जात झालेले चढ उतार समजून घेण्यासाठी भारतीय समाज व्यवस्थेच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पार्श्वभूमीचा ऐतिहासिक मागोवा घेणे आवश्यक आहे.

इसवी सन पूर्व ६०० पर्यंतचा कालखंड वैदिक कालखंड समजला जातो. वैदिक काळात स्त्रियांना वैदिक मंत्र म्हणण्याची परवानगी होती.उपनयनाशिवाय वैदिक मंत्र म्हणण्याचा अधिकार कुणालाही नव्हता. त्यामुळे स्त्रियांचे उपनयन झाल्यावरच त्यांच्या शिक्षणाला सुरुवात होई. या काळात अनेक विद्वान स्त्रिया निर्माण झाल्या. घोषा, अपाला, विश्वंभरा इत्यादी स्त्रियांनी वैदिक मंत्र व भजनांची रचना केली होती. तर गार्गी आणि मैत्रेयी ऋषी महिला होत्या.वैदिक काळात बालविवाह प्रचलित नव्हता. मुलींना आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य होते. विधवा आपल्या इच्छेनुसार पुर्नविवाह करु शकत होती. पत्नीच्या रुपात स्त्रीचे स्थान चांगले होते.

इसवी सन पूर्व ६०० ते इसवी सन ३०० वर्षानंतरचा काळ उत्तर वैदिक काळ म्हणून संबोधला जातो. महाभारत काळ संक्रमणकाळ म्हणून ओळखला जातो. याच कालखंडात बौध्द आणि जैन धर्माचा प्रभाव वाढला. बौध्द काळात स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत काही प्रमाणात सुधारणा घडून आली. संघाच्या माध्यमातून स्त्रियांना समाजसेवा तसेच समाज जीवनाच्या अनेक पातळ्यांवर सहभागी होण्याची संधी निर्माण करुन दिली. सामाजिक क्षेत्रांत मानाचे स्थान मिळवून दिले. परंतु राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांत कुठलेही परिवर्तन झाले नाही. या धर्माच्या पतनाबरोबरच स्त्रियांची स्थितीही खालावली.

इसवी सन ३०० ते ११०० च्या पूर्वार्धापर्यंतचा काळ धर्मशास्त्राचा कालखंड म्हणून ओळखला जातो. हा काळ सामाजिक व धार्मिक संकिर्णतेचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात स्त्रिया पराधीन, दुर्बल मानल्या जाऊ लागल्या. स्त्रियांचे संपत्तीविषयकचे अधिकार हिरावून घेतले गेले. त्यांना मानसिक दृष्टीकोनातून दुर्बल मानले गेले. याच काळात मुलींच्या विवाहाचे वय १० ते १२ वर्षापर्यंत खाली आले. मुलीसाठी वराची निवड आईवडिलांद्वारे होऊ लागली. याच काळात बहुपत्नी प्रथेत वाढ झाली आणि विधवा पुनर्विवाहाची व्यवस्था बंद पडली. याच काळात समृतांकारांनी स्त्रियांची स्थिती खालावण्यात प्रमुख भूमिका साकारली. मनु स्वतः म्हणतो, “ स्त्रिया कधीच स्वातंत्र्याच्या योग्य नाहीत. बाल्यावस्थेत पिता, युवावस्थेत पती आणि वृध्दावस्थेत पुत्राच्या सान्निध्यात संरक्षणात राहिली पाहिजे ” या काळाच्या शेवटच्या कालावधीत तर स्त्रीला एक वस्तूच्या रुपात समजले जाऊ लागले आणि तिच्या स्वातंत्र्यावर कठोर बंधने लादली गेली. पतीला परमेश्वराचे स्वरुप प्रदान केले गेले आणि स्त्रियांनी सती जाणे आदर्श मानले गेले. याच काळात स्त्रियांचे वेद अध्ययन आणि यज्ञयागआदी करण्याचा हक्कही नाकारण्यात आला होता. ऋतूस्त्राव व प्रसुती या दोन गोष्टींमुळे विटाळ होतो. त्यामुळे स्त्रियांना धार्मिक विधीत सहभागी होता येत नाही असेही म्हटले आहे.

इसवी सन ११०० ते १७०० चा कालखंड मुस्लिम राजवटीचा कालखंड समजला जातो. आठव्या शतकात मोहमंदबीन कासिम या अरबाने भारतातील सिंध प्रांतावर सर्वप्रथम यशस्वीपणे आक्रमण केले. येथून पुढे चारशे वेळा सतत आक्रमणे होत राहिली. या कालखंडात पारंपारिक भारतीय हिंदू, बौध्द आणि जैन धर्मीय स्थिर समाज जीवनाचे उध्वस्तीकरण घडून आले म्हणजे तिन्ही धर्म विचारांचा पगडा असलेल्या स्थिर भारतीय समाजात मुसलमानांच्या आक्रमणामुळे अस्थिरता निर्माण झाली. या कालखंडात हिंदू धर्म संस्कृतीच्या रक्षणाच्या नावाखाली अनेक प्रतिबंध घातले, त्यांना अधिकारापासून वंचित ठेवले गेले आणि त्यांच्यावर अनेक नियंत्रणे लागू केली गेली. या काळात स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नव्हता. बालविवाहाची प्रथा रुढ झाली. रक्तशुध्दीसाठी आणि शील रक्षणासाठी बाल विवाहासाठी प्रोत्साहन दिले गेले. याच कालावधीत पडदा पध्दतीचा विकास झाला. स्त्री चार भिंतीच्या आत कोंडली गेली. विधवांना पुनर्विवाह निषिध्द मानला गेला. सतीप्रथेला प्रोत्साहन दिले जाऊ लागले आणि अनेक विधवांना सती जाण्यास धारेवर धरल्या जाऊ लागले. या कालखंडात स्त्री पूर्णपणे पराधिन झाली होती.सामाजिक, आर्थिक आणि कौटूंबिक दृष्टीकोनातून स्त्री पुरुषावर निर्भर झाली होती. पतीची इच्छा पूर्ण करणे एकमात्र धर्म झाला होता. या कालखंडात धर्माच्या नावाखाली स्त्रियांचे सर्वाधिक शोषण झाले, ती फक्त पुरुषांची उपभोग्य वस्तू आहे आणि पाहिजे तसा तिचा उपभोग घ्यावा अशी मानसिकता निर्माण झाली होती.

१९ व्या शतकात ब्रिटीश राजवटीच्या रुपाने भारतीय स्त्री जीवनाची पहाट उगवली, ब्रिटीशांनी भारतात अनेक सुधारणांची मुहूर्तमेढ रोवली . त्यांनी सर्व भारतावर एकछत्री अंमल बसविला. कायद्याचे राज्य निर्माण केले. दळणवळणाच्या व वाहतुकीच्या प्रगत साधनांचे जाळे उभारले, स्त्री क्षूद्रांसह बहुजन समाजास शिक्षण खुले केले. मोठमोठे उद्योगधंदे उभारुन औदयोगिकरण व नागरिकरणास चालना दिली. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पाया घातला. ब्रिटीश अधिकारी व विचारवंतांनी भारतातील अनिष्ट रुढी व परंपरांवर टिकास्त्र सोडले. पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या भारतीयांच्या

मनावर स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद, बुध्दीवाद, तर्कशुध्द व वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा प्रभाव पडला. त्यांना भारतीय समाजातील जातीभेद, अस्पृश्यता, बालविवाह, विधवा विवाहबंदी, केशवपन, सतीप्रथा, बहुपत्नीत्व इत्यादी अनिष्ट रुढी अशास्त्रीय व कालबाह्य वाटू लागल्या आणि त्याच्या निर्मूलनासाठी त्यांनी सुधारणा चळवळी सुरु केल्या.

स्त्री शिक्षणास प्रारंभ :-

ब्रिटीशांनी १८३५ पासून मुक्त शिक्षण पध्दतीचे धोरण अवलंबिले. त्यानुसार स्त्री क्षूद्रांसह सर्वांनाच शिक्षण खुले झाले. शिक्षण हाच स्त्रियांच्या उध्दारांचा योग्य मार्ग आहे हे ओळखून अनेक सेवाभावी संस्थांनी व व्यक्तिंनी मुलींसाठी शाळा सुरु केल्या. महात्मा फुले यांनी १८४८ मध्ये पुणे येथे व पंडीत ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी १८४९ मध्ये कलकत्ता येथे मुलींची शाळा काढली.महर्षी कर्वे यांनी पुण्याजवळ हिंगणे येथे स्त्री शिक्षण संस्था सुरु केली, पुढे १८१६ मध्ये त्यांनी स्वतंत्र महिला शिक्षण संस्था स्थापन केली. बेरामजी मलबारी यांनी मुलींच्या शिक्षणासाठी मुंबईत १९०८ साली सेवासदन स्थापन केले. याशिवाय स्वामी दयानंद सरस्वतींचा आर्य समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन, डेक्कन एज्यूकेशन सोसायटी आदी संस्था-संघटनांनी स्त्री शिक्षणासाठी ठिकठिकाणी शाळा उघडल्या. १८५४ साली वुड आयोगाच्या अहवालात स्त्री शिक्षणास प्राधान्य देवून स्त्री शिक्षण ही मुख्यत: शासनाची जबाबदारी असल्याचे मान्य केले. त्यानुसार अनेक खासगी शिक्षण संस्थांना सरकारने अनुदान पुरविल्यामुळे स्त्री शिक्षणास जोरदार चालना मिळाली. मुली, परितक्त्या, विधवा स्त्रिया शिकू लागल्या . प्रारंभी स्त्रियांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण दिले.१८८२ पासून मात्र त्या उच्च शिक्षणही घेवू लागल्या. विधवांना शिक्षणाबरोबरच अर्थार्जन करुन स्वावलंबी बनविण्याचे कार्यही स्त्री हळूहळू जागृत होऊ लागली. तिला आपल्या हक्कांची जाणीव झाली, ती स्वावलंबी झाली, पुरुषांच्या आधाराशिवाय परितक्त्या व विधवांना जगणे शक्य होऊ लागले.

ब्रिटीश राजवटीत सुरु झालेली स्त्रियांचा दर्जा उंचावण्याची प्रक्रिया केवळ शहरी, सुशिक्षित व उच्च स्तरातील स्त्रियांपुरतीच मर्यादित होती व सर्वसामान्य स्त्रिया मात्र परंपरेने लादलेल्या निर्बंधांचे पालन करीत चूल व मूल एवढ्यापुरतेच जीवन जगत होत्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र ही प्रक्रिया अधिक व्यापक व गतीमान बनलेली आहे. स्वातंत्र्यानंतर ५० वर्षात स्त्री जीवनात अनेक क्रांतीकारक बदल घडून आलेले आहेत. आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कर्तृत्व गाजवित असून स्त्री पुरुष समानतेचे तत्व स्विकारले गेल्याने स्त्रीला प्रत्येक क्षेत्रात समान संधी दिली जात आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण, औद्योगिकीकरण आणि नवीन विचारधारेमुळे स्त्रियांची पुरुषांवरील आर्थिक निर्भरता कमी होत आहे. स्वातंत्र्यापूर्वी सर्वसामान्य वर्गातील स्त्रिया कौटूंबिक कार्य आणि उद्योगाच्या माध्यमातून आपली उपजिविका भागवित होत्या, तर मध्यम आणि उच्च वर्गातील स्त्रियांचे आर्थिक कार्य अनैतिक समजले जात होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मध्यम वर्गातील स्त्रियांनी शिक्षण घेवून आर्थिक क्षेत्रात प्रवेश करण्यास सुरुवात केली आहे. आज समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, उद्योग आणि खासगी व शासकीय कार्यालयांमध्ये स्त्री कर्मचाऱ्यांची संख्या निरंतर वाढत आहे. त्याचबरोबर भारतीय स्त्रियांच्या मनोवृत्तीत मूलगामी परिवर्तन न झाल्यामुळे शिक्षण व आरोग्य या क्षेत्रालाच अधिक महत्व देताना दिसून येतात.

सामाजिक भूमिका अर्थ :-

कोणत्याही मानवी समुहाला व्यक्ती ही महत्वाची असते. समुहातंर्गत स्थानाच्या श्रेणी व्यवस्थेत व्यक्तीला तिच्या जन्म, वय, कुटुंब, वर्ग, व्यवसाय, विवाह आणि कर्तृत्वसिध्दी यामुळे प्राप्त झालेल्या स्थानास दर्जा असे म्हणतात. यंग व मॅक याच्या अभ्यासानुसार सामाजिक दर्जानुसार कार्य करणे म्हणजे सामाजिक भूमिका होय. हॅरी जॉन्सन यांच्या मते सामाजिक समुहातील स्थानाचे दर्जा व भूमिका हे दोन पैलू होत, यात व्यक्तीने स्वीकारलेली जबाबदारी पार पाडणे म्हणजे भूमिका वठविणे होय. म्हणजे व्यक्तीच्या दर्जानूसार व्यक्तीचे समाज अपेक्षित वर्तन म्हणजे भूमिका होय.व्यक्तीच्या सामाजिक स्थानाची कृतिशील बाजू म्हणजे भूमिका होय.

भूमिका संघर्षाचा अर्थ :-

एकाच वेळी व्यक्ती एकाहून अधिक दर्जे धारण करीत असते. आणि दर्जाशी संबंधीत अशा भूमिका विषयक अपेक्षांचे उल्लंघन करुनही ती भूमिका वठविणे त्या व्यक्तीला अशक्य होऊन बसते या परिस्थितीला भूमिका संघर्ष असे म्हणतात. एकाच वेळी एका व्यक्तीला दोन किंवा दोनापेक्षा अधिक भूमिका पार पाडाव्या लागतात व ह्या भूमिका पार पाडतांना जो संघर्ष निर्माण होतो त्यास भूमिका संघर्ष म्हणता येईल.

संशोधन समस्या व समस्या विधान :-

दुसऱ्या महायुध्दानंतर जीवन जगण्याचा वाढलेला खर्च एका व्यक्तीच्या मिळकतीवर कुटुंबाच्या भरणपोषणाचा खर्च भागविणे अशक्य झाल्यामुळे मध्यम वर्गातील स्त्रिया आर्थिक क्षेत्रात उतरल्या. आज कमावत्या स्त्रियांना गृहिणी व कमावती स्त्री असा दुहेरी भूमिकेचा ताण सहन करावा लागत आहे. घरकाम व बालसंगोपन ही पूर्णतः स्त्रीचीच जबाबदारी आहे अशी समाजाची व स्वतः स्त्रीचीही समजूत असल्याने गृहिणी व नोकरदार स्त्री अशा दुहेरी भूमिकेच्या ओझ्याखाली ती दडपली जाते. अर्थार्जनाबरोबरच घरकाम करणे , मुलांकडे लक्ष देणे, कुटुंबियांच्या अपेक्षा पूर्ण करणे अशी विविध कामे करताना स्त्रीची ससेहोलपट होते. नोकरीमुळे स्त्रीचे आर्थिक स्वावलंबन वाढले हेही खरे नाही. पत्नीच्या कमाईवर पतीचा हक्क असतो. पतीच्या संमतीने स्त्रियांना खर्च करावा लागतो. स्त्री नोकरी करीत असली तरी कुटुंबाच्या निर्वाहाची जबाबदारी पुरुषांचीच मानली जाते व स्त्रीचे कमावणे दुय्यम व पूरक मानले जाते. कमावती स्त्री अशा दुहेरी भूमिकेच्या ओझ्याखाली पिचत आली आहे.

शिक्षिकेची नोकरी महिलांना सुरक्षित व योग्य नोकरी वाटत असल्याने ही जबाबदारी पार पाडत असतांना बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांना सुध्दा अशा समस्यांना सामोरे जावे लागते असे वाटते हा दृष्टीकोन समोर ठेवून बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांच्या कौटूंबिक आणि नौकरीविषयक भूमिका संघर्षाचा समाजशास्त्रीय अभ्यास अशी संशोधन समस्या निश्चित करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

०१. बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांच्या सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

०२. बीड जिल्ह्यातील महिला शि क्षकांच्या कौटुंबिक आणि नोकरीविषयक भूमिकांचा अभ्यास करणे

०३. बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांच्या दुहेरी भूमिका पार पाडतांना होणाऱ्या भूमिकासंघर्षाचा अभ्यास करणे.

०४. बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांच्या भूमिका संघर्षामुळे होणाऱ्या शारिरीक व मानसिक ताणतणावांचा अभ्यास करणे

०५. महिलांच्या कौटुंबिक कार्याचे मुल्य तपासणे.

०६. बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांच्या भूमिका संघर्षामुळे होणाऱ्या शारिरीक व मानसिक परीणामांवर उपाययोजना सुचविणे.

गृहितकृत्ये :-

कोणताही संशोधक हा पूर्वज्ञानावर आधारित त्या विषयाचा अभ्यास करतो व त्याबाबतचे सामान्य अनुमान बांधतो. ते अनुमान पुढच्या संशोधनासाठी मार्गदर्शक ठरते, या कामचलाऊ पूर्वानुमानाला गृहितकृत्य असे म्हणतात.

०१ शिक्षिकेची नोकरी करीत असल्याने बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती चांगली आहे.

०२ शिक्षिकेची नोकरी करीत असल्यामुळे बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांचे कौटूंबिक जबाबदारीकडे दूर्लक्ष होते.

०३ बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांना नोकरदार महिला व गृहिणी अशा दोन्ही भूमिका पार पाडताना भूमिका संघर्षास सामोरे जावे लागते.

०४ बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांना दुहेरी भूमिका पार पाडतांना शारिरीक व मानसिक त्रास सहन करावा लागतो.

०५. महिलांच्या कौटुंबिक कार्याचे मुल्य न्यून आहे.

संशोधन विषयाचे कार्यक्षेत्र :-

संबंधित संशोधन समस्येच्या संशोधनासाठी मराठवाड्यातील मागास समजल्या जाणाऱ्या व साधारणतः महाराष्ट्राच्या मध्यभागी असणाऱ्या बीड जिल्ह्याची निवड करण्यात आलेली असून बीड जिल्ह्यातील महिला शिक्षिकांच्या कौटुंबिक आणि नोकरीविषयक भूमिका संघर्षाचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन पध्दती :-

सामाजिक संशोधनात संशोधनाचे उद्दिष्ट्य निश्चिती झाल्यानंतर त्या उद्दिष्ट्यांपर्यंत पोहोचण्यासाठी नेमक्या कोणत्या मार्गाचा अवलंब करावा याविषयीचे पूर्व नियोजन अभ्यासकाला करावे लागते. यालाच संशोधन आराखडा असे म्हणतात.

एकॉफ यांच्या मते “निर्णय कार्यान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वी निर्णय निर्धारीत करण्याच्या प्रक्रियेला आराखडा असे म्हणतात. ”

प्रस्तूत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला जाणार आहे.

नमुना निवड :-

सामाजिक संशोधन करीत असतांना ज्याच्याकडून माहिती मिळवायची असते असा गट, वर्ग किंवा नमुना लक्षात घ्यावा लागतो. समस्या संशोधनाशी प्रत्यक्ष संबंध असणाऱ्या व्यक्तींना नमुना म्हणून निवडावे लागते. हा नमुना समाजात विस्तृत स्वरुपात पसरलेला असतो. म्हणून संशोधनाचा कालावधी उद्देश लक्षात घेवून विस्तृत प्रमाणात असलेल्या नमुन्यातील प्रातिनिधीक स्वरुपात व त्यातून काही विशिष्ट नमुन्यांचा तथ्य संकलनात समावेश करुन घ्यावा लागतो व त्यातून काढलेले निष्कर्ष हे संपूर्ण समुहाचे असतील असे गृहीत धरले जाते. याच पध्तीला नमुना निवड असे म्हणतात.

प्रसिध्द विचारवंत गुड आणि हॅट यांच्या मते, “नमुना त्यातील नावाप्रमाणेच एका विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे .आणि श्रीमती यंग यांच्या मता प्रमाणे एक सांख्यिकीय नमुना म्हणजे संपूर्ण समुहाच्या किंवा समग्राचा एक निवडलेला क्षण होय.”

संबंधित संशोधन करताना बीड जिल्ह्यातील शासकीय स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थेंतर्गतत्र (जिल्हा परिषद) ११ तालुक्यातील विविध पंचायत समित्यांतर्गत प्राथमिक स्तरावर कार्यरत असलेल्या १०२७५ महिला शिक्षिकांपैकी २०० महिला शिक्षिकांची निवड नमुना निवड पध्दतीतील संभाव्यता नमुना निवड प्रकारातील सहेतूक पध्दतीचा व लॉटरी पध्दतीचा वापर करुन निवड करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :-

तथ्य संकलनाशिवाय तथ्य शोधणे असंभव आहे आणि योग्य तथ्य संकलनाची यशस्विता तथ्य संकलनात उपयोगात आणलेल्या पध्दतीवर अवलंबून आहे. हे तथ्य संकलन दोन प्रकारे केले जाते.

०१ प्राथमिक स्त्रोत :-

जेव्हा प्रत्यक्षपणे उत्तरदात्यांशी संपर्क साधून त्याच्याकडून जी माहिती गोळा केली जाते त्यास प्राथमिक तथ्य संकलन म्हणतात. प्रस्तुत संशोधनासाठी महिला शिक्षिकांकडून माहिती मिळविण्यासाठी मुलाखत अनुसूची या तथ्य संकलन तंत्राव्दारे तथ्य संकलीत केले जाणार आहेत.

०२ दुय्यम स्त्रोत :-

जेव्हा एखाद्या पुस्तकातून किंवा अहवालातून तथ्य संकलन केले जाते तेव्हा त्यास दुय्यम स्त्रोत तथ्य संकलन म्हणतात. यामध्ये प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, केंद्र व राज्य समित्यांचे विविध अहवाल, शोध, प्रबंध, ग्रंथ, लेख , मासिके, वर्तमानपत्रे व इंटरनेट वेबसाईट या स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

तथ्य विश्लेषण :-

तथ्य संकलन पध्दतीने संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण अभ्यासाच्या उद्यिष्टांनुसार करण्यात येणार आहे, त्यासाठी तथ्यांची वर्गीकरण तालिका, शेकडा प्रमाण, प्रमाण विचलन, सहसंबंध इत्यादी सांख्यिकीय साधनांचा वापर केला जाणार आहे.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रकरण दुसरे :- संशोधन पध्दती

प्रकरण तिसरे :- महिला शिक्षिकांच्या वैयक्तिक, सामाजिक,शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा आढावा.

प्रकरण चौथे :- महिला शिक्षिकांच्या कौटुंबिक आणि नौकरीविषयक भूमिका संघर्षाचा आढावा

प्रकरण पाचवे :- दुहेरी भूमिकेमुळे होणाऱ्या शारिरीक व मानसिक ताणतणावाचा आढावा

प्रकरण सहावे :- निष्कर्ष व शिफारशी

वरीलप्रमाणे प्रकरण योजना तयार करण्यात आली. त्यानुसार शोधप्रबंध तयार करण्यात येणार आहे.

मार्गदर्शक

डॉ. राम वाघ
प्राचार्य,
व्यंकटराव देशमुख महाविद्यालय
बाभळगांव, जि. लातूर

संशोधक

बावस्कर गोविंद दत्तात्रय
एम.ए.नेट, एम.फिल(समाजशास्त्र)
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
किल्लेधारुर, जि. बीड

संदर्भ सूची :-

१ साने गीता - भारतीय स्त्री जीवन, प्रकाशक संजय भागवत, मौज प्रकाशनगृह,खटाववाडी,गिरगांव,मुंबई,२०१०

२ खंडागळे चंद्रकांत-भारतीय समाज, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे,गणेशनगर,सांगली, जुलै १९९८

३ वर्मा ज्योती - भारतीय समाज,डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस,अन्सारी रोड,दरियागंज,प्रथमावृत्ती २००७

४ साळुंखे आ.ह - हिंदू संस्कृती आणि स्त्री, प्रकाशक राजेंद्र साळुंखे, लोकायत, यशवंतनगर,गेडामाळ,सातारा डिसेंबर १९८९

५ डॉ.शेटकर गणेश,डॉ.शेवतेकर शारदा, डॉ.जोशी शोभना- भारतीय समाजाचा इतिहास,मृण्मयी प्रकाशन,औरंगाबाद प्रथम आवृत्ती २००२

६ नाटाणी शोभा- भारतीय समाज एवं नारी दिशा एवं दशा, मार्क पब्लिशर्स,वैशालीनगर, जयपूर, प्रथम आवृत्ती, भाग-२ २०१०

७ अळतेकर एस.एस. - The position of woman in Hindu Civilisation, प्रकाशक सुंदरलाल जैन, जवाहरनगर, दिल्ली

८ गुप्त कमलेशकुमार - भारतीय महिलाएँ शोषन,उत्पिडन एवं अधिकार, प्रकाशक बुक एन्क्लेव्ह, दिल्ली , २००६

९ शरयू अनंतराम व वंडसे उमा - भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९८७

१० डॉ. पाटील मंगला - काल, आज आणि उद्या, स्त्री परिवर्तनाची आव्हाने,डॉ.बा.आं.म.विद्यापीठाच्या श्रीमती काशीबाई अण्णाराव गऊळकर स्मृती व्याख्यानमालेतील व्याख्याने, संपादिका. डॉ.शुभांगी गोटे/गव्हाणे,साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद, २००३

११ गुप्त कमलेशकुमार - भारतीय महिलाएँ शोषन,उत्पिडन एवं अधिकार, प्रकाशक बुक एन्क्लेव्ह, दिल्ली , २००६ पृ क्रं३६

१२ बीड जिल्हा आर्थिक व सामाजिक विमोचन

१३ घाटोळे रा ना - समाजशास्त्रीय संशोधनः तत्वे व पध्दती, फडके प्रकाशन, नागपूर १९९७

१४ डॉ. बोधनकर आणि प्रा. अलोनी - सामाजिक संशोधन पध्दती : शास्त्र व तंत्रे, प्रकाशन नागपूर

१५ भांडारकर पु. ल. - सामाजिक संशोधन पध्दती , महाराष्ट्र विद्यापीठ निर्मिती मंडळ, दत्त सदन,प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती १९७६

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पी.एच.डी पदवीसाठी सादर केलेला
संशोधन आराखडा

महिला शिक्षिकांच्या कौटुंबिक आणि नोकरीविषयक भूमिका संघर्षाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ बीड जिल्हा

संशोधक

गोविंद दत्तात्रय बावस्कर

मार्गदर्शक

डॉ. राम वाघ

प्राचार्य,

व्यंकटराव देशमुख महाविद्यालय

बाभळगांव, जि. लातूर

-:संशोधन केंद्र:-

मार्च २०१६